पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आदी उपस्थित होते.

# विद्यापीठात संत सेवालाल महाराज जयंती

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठात संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, समाजशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. जगन कराडे, डॉ. प्रल्हाद माने, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील उपस्थित होते.

तरूण भारत

# विद्यापीठात संत सेवालाल जयंती साजरी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, समाजशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. जगन कराडे, डॉ. प्रल्हाद माने, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

सकाळ

# संत सेवालाल महाराजांना अभिवादन

कोल्हापूर, ता. १५ : संत सेवालाल महाराजांना आज अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्या हस्ते सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस हार अर्पण करण्यात आला. डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. जगन कराडे, डॉ. प्रल्हाद माने, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील उपस्थित होते.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात संत सेवालाल महाराज जयंती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यांप्रसंगी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, समाजशास्त्र अधिविभागप्रमुख जगन कराडे, प्रल्हाद माने, प्राचार्य व्ही. एम. पाटील आदी उपस्थित होते.

लोकमत

# संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात संत सेवालाल महाराज यांची जयंती मंगळवारी उत्साहात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, समाजशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. जगन कराडे, प्रल्हाद माने, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, आदी उपस्थित होते.

1 6 FEB 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संपत्तीच्या हव्यासाने गरीब-श्रीमंत दरी

## डॉ. भोईटे; 'असमानता आणि दारिद्र्य' पुस्तकाचे ऑनलाईन प्रकाशन



**कोल्हापूर : डॉ. जगन कराडे व डॉ. राजेंद्र पाटील संपादित 'असमानता आणि दारिद्र्य' पुस्तकाच्या ऑनलाईन प्रकाशनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी डॉ. कराडे, डॉ. पाटील.**

कोल्हापूर, ता. १५ : 'भांडवलशाहीच्या रेट्यात संपत्ती संचयाच्या हव्यासातून जगात गरीब-श्रीमंत अशी दरी वाढत आहे. त्यातून असमानतेला खतपाणी घातले जात आहे,' असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. उत्तम भोईटे यांनी मंगळवारी येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रातर्फे 'असमानता आणि दारिद्र्य' पुस्तकाच्या ऑनलाईन प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. भोईटे म्हणाले, 'दारिद्र्य व असमानता ही मानवी जगण्यासमोरची दोन मोठी आव्हाने व अविभाज्य घटक आहेत. दारिद्र्याचे दशावतारही अनेक स्वरूपाचे आढळतात. आपण एकावर उपाय शोधला की, त्याचा नवा प्रकार समोर येतो, असे निरंतर सुरू आहे. पूर्वी 'घट्टीकट्टी गरिबी, लुळीपांगळी श्रीमंती' या ब्रीदाचा समाजाच्या राहणीमानावर वरचष्मा होता.'

ते म्हणाले, 'भांडवलशाहीच्या रेट्यात अधिकाधिक संपत्ती जमा करण्याचा हव्यास घातक ठरत आहे. ही बाब सर्वांनाच साधत नाही आणि समाजातील आर्थिक दरी अधिकाधिक रुंदावतेच आहे. या अनुषंगाने समाजशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञांनी आपापल्या परीने उपाययोजना शोधत राहणे समाज स्वास्थ्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. डॉ. जगन कराडे आणि डॉ. राजेंद्र पाटील यांनी या संपादित पुस्तकाच्या माध्यमातून त्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे.'

डॉ. शिर्के म्हणाले, 'जगातील दारिद्र्य आणि असमानता यावर मात करण्याची अगर त्या अनुषंगाने संशोधन करण्याची जबाबदारी ही केवळ काही ठरावीक अभ्यासक्षेत्रांची अथवा संशोधकांचीच आहे, असे नव्हे; तर, प्रत्येक समाजघटकाचे त्यासाठी काही उत्तरदायित्व आहे, याची सर्वदूर जाणीव निर्माण होणे ही आजची गरज आहे.'

डॉ. शिर्के यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले. पुस्तकाच्या अनुषंगाने झालेल्या परिसंवादात राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ मान्यवरांनी सहभाग घेतला. यामध्ये डॉ. विद्युत जोशी (गुजरात), डॉ. आर. इंदिरा (कर्नाटक), डॉ. आनंद कुमार (गोवा), डॉ. वेन्केटेश्वरलु (आंध्र प्रदेश), डॉ. एस. गुरुस्वामी (तमिळनाडू), डॉ. अरविंदर अन्सारी (नवी दिल्ली), डॉ. बिस्वजीत घोष (पश्चिम बंगाल), डॉ. नागराजू गुंडेमेडा (हैदराबाद), प्रणित रावत यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. अविनाश भाले यांनी आभार मानले.

सकाळ

# म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार वसंत पाटणकर यांना जाहीर



**वसंत पाटणकर**

कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार ज्येष्ठ समीक्षक वसंत पाटणकर यांना शुक्रवारी (ता. १८) देण्यात येणार आहे. भाषा अभ्यासक पद्मश्री डॉ. गणेश देवी यांच्या हस्ते त्याचे वितरण होईल. रोख रक्कम ५१ हजार व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. राजर्षी शाहू सभागृहात दुपारी साडेचारला कार्यक्रमास सुरुवात होईल. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी ही माहिती दिली.

पुढारी

# डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्काराचे शुक्रवारी वितरण

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार मराठीतील ज्येष्ठ समीक्षक, कवी वसंत पाटणकर यांना शुक्रवारी (दि. १८) ज्येष्ठ विचारवंत व भाषा अभ्यासक पद्मश्री डॉ. गणेश देवी यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात शुक्रवारी दुपारी ४.३० वाजता पुरस्कार प्रदान कार्यक्रम होईल. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे, डॉ. राजन गवस व कवयित्री नीरजा उपस्थित राहणार आहेत. समारंभास साहित्यप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

16 FEB 2022 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दीक्षांत सोहळा ५ मार्चला ऑनलाईन

**कोल्हापूर, ता. १५ :** शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षांत सोहळा येत्या ५ मार्चला ऑनलाईन होणार आहे. त्याची तयारी सुरू झाली असून, प्रमुख पाहुणे निश्चित करण्यासाठी बैठका सुरू झाल्या आहेत.

विद्यापीठ स्तरावर सोहळा साजरा केला जात असला तरी संलग्नित महाविद्यालयांतही विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे दिली जातात. गतवर्षी कोरोनामुळे सोहळा ऑनलाईन झाला होता. यंदा कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होत असल्याने सोहळा ऑफलाईन होणार का, अशी चर्चा सुरू होती. प्रशासनाने मात्र ऑनलाईन सोहळा घेण्याची तयारी केली आहे. त्याकरिता प्रमुख पाहुणे निश्चित करण्याचे काम सुरू झाले आहे.

विद्यापीठातर्फे एक मार्चपर्यंत सुटी जाहीर केली असून, दोन मार्चला महाविद्यालये सुरू होणार आहेत. त्यानंतर महाविद्यालयीन



स्तरावरील पदवी प्रदान सोहळा आयोजित करण्याच्या हालचाली सुरू होतील. सध्या विविध अभ्यासक्रमांच्या ऑनलाईन परीक्षा सुरू आहेत.

16 FEB 2022
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवोन्मेषाच्या दिशेने... शिवाजी विद्यापीठ!

पान २ वरून...

याशिवाय सामाजिक समस्यांच्या उपायांमधील त्यांच्या मूल्यांबरोबरच कोणत्याही देशाची ओळख, प्रगती, आत्मिक व बौद्धिक समाधान आणि कल्पकता या गोष्टीही देशाचा इतिहास, कला, भाषा व संस्कृती इ.द्वारे मोठ्या प्रमाणात साध्य केल्या जातात. विज्ञान आणि सामाजिक शास्त्रांतील शोधांबरोबरच कला आणि मानव्यशास्त्रातील संशोधनही देशाच्या प्रगतीसाठी व आत्मज्ञानासाठी अतिशय महत्त्वाचे आहे, ही बाब लक्षात घेऊन नव्या शैक्षणिक धोरणात बहुशाखीय संशोधन, नवोपक्रम व नवनिर्मिती यांना प्रोत्साहनाचे सूतोवाच केले आहे.

या धोरणाला पूरक, किंबहुना अधिक उपयुक्त अशी तरतूद महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा २०१६ मध्ये करण्यात आली आणि ती म्हणजे नवोपक्रम, नवसंशोधन व उपक्रम मंडळाची स्थापना होय. यापूर्वीच्या कायद्यांमध्ये नसलेले, मात्र या नूतन कायद्यामध्ये ठळकपणाने अधोरेखित करण्यात आलेले हे मंडळ आहे. त्याची घटना ही स्वतंत्र संचालकाच्या नियुक्तीसह करण्यात आली आहे. नवोपक्रमाच्या संकल्पनेचा प्रसार करण्यासाठी आणि ज्यामुळे अंतिमतः उपक्रम निर्मिती होते, अशा नवसंशोधन प्रक्रियेद्वारे नवनवीन कल्पना, कार्यकारी प्रतिमानांमध्ये पोषक वातावरणनिर्मिती करण्याकरिता व ती रुजविण्याकरिता नवोपक्रम, नवसंशोधन व उपक्रम मंडळ असेल, असे कायद्याच्या कलम ५३ अन्वये उद्घोषित करण्यात आले असून, या मंडळाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विद्यापीठाने स्वतंत्र नवोपक्रम, नवसंशोधन व उपक्रम केंद्र स्थापन करावे, असेही सूचित करण्यात आले आहे. कुलगुरूंच्या अध्यक्षतेखालील या मंडळात अधिष्ठाते, संशोधक, शिक्षक, माहिती तंत्रज्ञान विभागाचा प्रतिनिधी यांच्यासह उत्पादन, माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान, जैव विज्ञान व तंत्रज्ञान, कृषी उद्योग व सेवा उद्योग यांमधून नामनिर्देशित केलेल्या पाच ख्यातनाम उद्योगपतींचा सहभाग ही यातील सर्वात महत्त्वाची तरतूद आहे. या निमित्ताने प्रथमच सार्वजनिक विद्यापीठे आणि खासगी उद्योग समूह यांची कायद्यान्वये भागीदारी अस्तित्वात आली आहे. भावी पोषक भागीदारीची ही एक उपयुक्त सुरुवात मानायला हवी.

या पार्श्वभूमीवर, शिवाजी विद्यापीठाने शिवाजी सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड लिंकिजेस या केंद्राची स्थापना केली आहे. डॉ. एम. एस. देशमुख हे संचालक म्हणून केंद्राच्या कामकाजाची धुरा सांभाळत आहेत. उद्योजकता विकासाद्वारे जीवनाचा दर्जा सुधारण्यावर लक्ष केंद्रित करून विद्यार्थी, शिक्षक आणि समाजातील सदस्यांकडून उत्पादनाभिमुख नावीन्यपूर्ण आणि कार्यान्वित करण्यायोग्य कल्पना आणि संकल्पनांना प्रोत्साहन देणे आणि प्रत्यक्षात आणणे, तसेच समाजाच्या वा उद्योगांच्या फायद्यासाठी प्रक्रिया अगर सेवा यांच्या अनुषंगाने त्यांना उत्पादनांमध्ये कल्पना साकार करण्यास मदत करणे, या उद्दिष्टपूर्तीचे ध्येय केंद्राने बाळगून आपली वाटचाल आरंभली आहे. या केंद्राला महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटीद्वारे बीज अनुदान ५ कोटी रुपये इतके अर्थसहाय्य दिले जाते. महाराष्ट्र राज्यात कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या नवोन्मेष-चालित उद्योजकीय परिसंस्थेला चालना देण्यासाठी ही सोसायटी नोडल सरकारी संस्था म्हणून कार्यरत आहे. ही संस्था राज्यात असे उपयुक्त वातावरण तयार करण्यासाठी वचनबद्ध आहे, जिथे स्टार्टअप योजना यशस्वीरीत्या राबवता येऊ शकतील, लाँच करता येतील आणि संकल्पनेपासून उद्योग-व्यवसायापर्यंतचा विस्तार करू शकतील. एकाच वेळी बाजारपेठेत विस्तार करण्यास आणि नीतिमूल्यांचे अनुसरण करून ब्रँड प्रस्थापित करण्यास सक्षम करणे, अशा दोन्ही अनुषंगाने ही सोसायटी राज्यात कार्यरत आहे.

शिवाजी विद्यापीठाने सोसायटीच्या सहकार्याने स्वतःचे केंद्र स्थापन केलेच, पण तेवढ्यावरच न थांबता दि. २८ ऑगस्ट, २०२१ रोजी केंद्र सरकारच्या कॉर्पोरेट अफेअर्स मंत्रालयांतर्गत एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन या नावाने सेक्शन-८ कंपनी स्थापन केली. कंपनीची पहिली बैठक ५ ऑक्टोबर, २०२१ रोजी झाली आणि त्यामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची कंपनीच्या चेअरमनपदी निवड करण्यात आली. केंद्र आणि फाऊंडेशन यांच्या संयुक्त संकल्पनांना मूर्त रूप देण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला आणि त्यानुसार कंपनीने पुढील कार्यवाहीस प्रारंभ केला.

विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांसह खासगी उद्योजक-व्यावसायिकांसमवेत वेबिनार्सच्या माध्यमातून संवाद प्रस्थापित करण्याबरोबरच उद्योग-व्यवसायाच्या नवसंकल्पनांविषयी चर्चा करण्यास, तसेच नवोदितांना त्यांच्या अनुभवाचे मार्गदर्शन प्रदान करण्यास एक महत्त्वाचा उपक्रम म्हणून तो सामोरा आला. आणंद (गुजरात) येथील ईडीआयच्या डॉ. शशिकांत, डॉ. त्रिपाठी, डॉ. विश्वजित आचार्य, एनसीएल (पुणे) येथील संशोधक डॉ. प्रकाश वडगावकर, आयएसटीई (नवी दिल्ली) येथील डॉ. प्रतापसिंह देसाई, आयआयटी, मुंबईचे डॉ. अजय देशपांडे, सीआयआयचे पश्चिम विभागीय चेअरमन डॉ. चरणसिंह आहुजा, बीएफ संशोधन व विकास फाऊंडेशन, पुणेचे विश्वस्त जी. जी. सोहनी, राजस्थानचे पेटंट अॅटर्नी अॅड. फाल्गुन बूच आणि नवी दिल्लीचे आयपी अॅटर्नी सौरभ जैन यांचा यामध्ये समावेश होता. विद्यार्थ्यांबरोबरच नवोपक्रम इच्छुकांसाठी ते प्रेरणास्थान ठरले.

याखेरीज नवोन्मेषी स्टार्टअपना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने आयोजिलेला इनोव्हेशन मीट हा उपक्रम पहिल्याच टप्प्यात प्रमाणापेक्षाही अधिक यशस्वी झाल्याचे दिसले. याअंतर्गत केंद्राने विविध उत्पादने, प्रक्रिया, बिझनेस मॉडेल होण्याची क्षमता असलेल्या कोणत्याही प्रकारची कल्पना, संकल्पना समाजातील कुठल्याही सर्वसामान्य नागरिकाच्या मनात असेल, त्यांनासुद्धा विनाअट सहभागाची संधी प्रदान करण्यात आली.

'नवनिर्मितीतून शाश्वत विकासाकडे' या संकल्पनेवर आधारित ही इनोव्हेशन मीट शिवाजी विद्यापीठात दि. २३ नोव्हेंबर, २०२१ रोजी एससीआयआयएल आणि एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली. व्यवस्थापन आणि सामाजिक शास्त्रे, मेकॅनिकल व ऊर्जा, संगणक व माहिती तंत्रज्ञान, अन्न, रसायने व जैवरसायनशास्त्र, आरोग्य आणि कृषी, फलोत्पादन, पर्यावरण, जैवविविधता व पर्यटन अशा सहा विभागांसाठी महाराष्ट्रभरातून सुमारे १३८ स्टार्टअपचे प्रस्ताव सादर झाले. दिवसभरात २७ विषयतज्ज्ञांसमोर सर्व उमेदवारांनी आपापल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने सादरीकरण केले. त्यातील निवडक नवोपक्रम घेऊन आता त्यावर केंद्राच्या तज्ज्ञांची टीम काम करत आहे. संकल्पनेपासून व्यवसाय विस्तारापर्यंत अशी 'स्टार्टअप' वाटचाल आता शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून परिक्षेत्रात साकारू लागली आहे. विकासाचे अंकुर त्यातून या शाहूभूमीत नव्याने रुजू पाहताहेत.